प्रसारमाध्यमांशी संबंधित व्यक्तींना
अधिस्विकृती पत्र देण्यासंबंधीचे नियम

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन शुध्दीपत्र क्र.अधिस्वि-२००९/६७६/प्र.क्र.१२३/३४,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ६ ऑगस्ट, २००९

संदर्भ-शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग
१) क्र.अधिस्वी-२००७/३५३/प्र.क्र.४९/३४, दि. १९ सप्टेंबर, २००७
२) शासन शुध्दीपत्रक क्र.अधिस्वि-२००७/प्र.क्र.४९/३४, दि. ७ जानेवारी, २००८
३) शासन शुध्दीपत्रक क्र.अधिस्वि-२००७/प्र.क्र.४९/३४, दि. ७ फेब्रुवारी, २००८
४) शासन निर्णय क्र.अधिस्वि-२००८/२६९/प्र.क्र.४९/०७/३४, दि. ७ मार्च, २००८
५) शासन निर्णय क्र.अधिस्वि-२००८/२६९/प्र.क्र.४९/०७/३४, दि. २९ एप्रिल, २००८
६) शासन पूरकपत्र क्र.अधिस्वि-२००८/१००६/प्र.क्र.४९/०७(भाग-२)/३४, दि. ३१ जानेवारी, २००९
७) माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे पत्र क्र. अधिस्वी-१०(२००९)न.नि./का.२/ ३५५ दि. २२ जुलै, २००९.

शुध्दीपत्र :-

प्रसारमाध्यमांशी संबंधीत व्यक्तींना अधिस्विकृती पत्र देण्यासंबंधीची नियमावली दि. १९ सप्टेंबर, २००७ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे संदर्भाधीन अनु क्र. ६ येथील शासन पूरकपत्राद्वारे या नियमातील नियम क्र. ७(१) ए सुधारण्यात आलेला आहे. सदर दि. ३१.०१.२००९ च्या पूरकपत्रकाद्वारे सुधारण्यात आलेला नियम क्र. ७(१) ए आता रद्द करण्यात येत असून त्याऐवजी अधिस्विकृती नियमावलीतील नियम क्र. ७ (१) ए खालीलप्रमाणे वाचण्यात यावा.

"जेष्ठ पत्रकार म्हणून अधिस्वीकृती पत्रिका मिळण्यासाठी पुढीलप्रमाणे निकष निश्चित करण्यात येत आहेत.

१) किमान ३० वर्षे श्रमिक पत्रकार/छायाचित्रकार म्हणून सेवा करून सेवानिवृत्त झालेले व किमान ६० वर्षे वय झालेले पत्रकार/छायाचित्रकार

२) किमान ३० वर्षे स्वतंत्र व्यवसायी पत्रकार/छायाचित्रकार म्हणून पत्रकारिता/छायाचित्रकार म्हणून पत्रकारिता करून निवृत्त झालेले व किमान ६० वर्षे वय पूर्ण झालेले स्वतंत्र व्यवसायी पत्रकार/छायाचित्रकार.

३) किमान ३० वर्षे मालक-संपादक म्हणून पत्रकारिता करून निवृत्त झालेले व किमान ६० वर्षे वय पूर्ण झालेले मालक/संपादक.

उपरोक्त संवर्गातील पत्रकारांनी विहित नमुन्यात साध्या कागदावर अर्ज करावेत. अन्य कागदपत्रे जोडणे त्यांच्यावर बंधनकारक असणार नाही. अशा अधिस्वीकृती पत्रिकेचे नुतनीकरण विद्यमान नियमानुसार होइल.

ज्या पत्रकारांना पूर्वीच्या नियमानुसार जेष्ठ पत्रकार म्हणून अधिस्वीकृती पत्रिका मंजूर झालेल्या आहेत, त्या यापूढे देखील (नुतनीकरणाच्या अधिनतेने) चालू राहतील. "

वरील निर्णय हे आदेश निर्गमित केलेल्या दिनांकापासून अंमलात येईल.

हे शासन शुध्दिपत्रक, महाराष्ट्र शासनाच्या www. maharashtra. gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्यांचा संगणक संकेतांक २००९०८०६१६१०३७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-

(आ.म.लुडबे)

कार्यासन अधिकारी

प्रति,

मा. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री (मा. व ज.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मुख्यसचिव यांचे उपसचिव, मुख्यसचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई
सचिव (मा. व ज.) यांचे स्वीय सहायक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
संचालक (माहिती)(प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
संचालक (माहिती), नागपूर, औरंगाबाद, अमरावती, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
उपसंचालक (माहिती), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,अमरावती,
सर्व विभागीय उपसंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई, कोकण, पुणे,
कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद, लातूर, अमरावती, नागपूर
सर्व जिल्हा माहिती अधिकारी,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
संचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र, अे-८, स्टेंट एम्पोरियम इमारत, बाबा खडकसिंग मार्ग, नवी दिल्ली-११० ००१
वरिष्ठ सहाय्यक संचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र, श्री.काकुले यांची इमारत, दादा वैद्य रोड, पणजी, गोवा,
सर्व संबंधित संघटना आणि सदस्य (महासंचालक, माहिती व जनसंपर्क यांचे मार्फत),
निवड नस्ती.